माहिती तंत्रज्ञान धोरणास अनुसरुन, खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान व त्यातील माहिती तंत्रज्ञान उद्योग घटकांना सवलती/सूट इत्यादी मिळणेसाठी पात्रतेचे निकष आणि अटी व शर्ती सुधारणा करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्र. मातंधो २०१३/प्र.क्र. ३०९/उद्योग-२
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २८ मे, २०१४

वाचा :

१) शासन निर्णय : आयटीपी २००५/प्र.क्र.३९२३/उद्योग-७, दिनांक १० जून, २००५
२) शासन शुध्दीपत्रक क्र: आयटीपी २००५/प्र.क्र. १३२७/उद्योग-२, दिनांक २६ मे, २००६
३) शासन शुध्दीपत्रक क्र. आयटीपी २००७/प्र.क्र. १६६४/उद्योग-२, दिनांक २ फेब्रुवारी, २००७
४) शासन निर्णय क्रमांक : आयटीपी-२००७/प्र.क्र.१७३२/उद्योग-२, दिनांक ३ मे, २००७.
५) परि. १ शासन निर्णय क्र.आयएमसी २००८/(प्र.क्र.४६)/उद्योग-२, दि. १३.०८.२००८
६) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक आयटीपी २००३/प्र.क्र. ३३११/उद्योग-७, दिनांक १२.०७.२००३
७) शासन निर्णय, शुध्दीपत्रक, क्रमांक आयटीपी २००५/प्र.क्र. १०९७/उद्योग-२, दिनांक २४.११.२००५
८) माहिती तंत्रज्ञान सेवा धोरण २००९ अंतर्गत गठित करण्यात आलेल्या शक्तिप्रदान समितीच्या दिनांक १०/१०/२०१३ रोजीच्या तिसऱ्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना:-

प्रचलित माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणांतर्गत माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या विकासकाने इरादापत्र मिळाल्यापासुन ५ वर्षाच्या कालावधीत उद्यानाचे प्रकल्प पुर्ण करुन नोंदणी प्रमाणपत्र घेणे अपेक्षित आहे. तथापि काही खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाने इरादापत्र घेऊन ५ वर्ष किंवा त्याहून अधिक काल झालेला आहे आणि त्यांनी सदर कालावधीत बांधकाम पूर्ण केले आहे परंतु इरादापत्र व्यपगत ठरलेले आहे तसेच नियोजन प्राधिकरणाकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा तंत्रज्ञान क्षेत्रातील मंदीमुळे तसेच मोठे प्रकल्प होण्यास येत असलेल्या अडचणीमुळे प्रकल्प पूर्ण होवु शकलेले नाही तसेच इरादापत्राच्या मुदत संपल्यानंतर ६ महिन्याच्या कालावधीपर्यंत विकासकाने सक्षम प्राधिकाऱ्याकडे नोंदणी / वैधता कालावधीसाठी मुदतवाढ करीता अर्ज सादर करण्याची अटींच्या पालन केलेले नाही त्यामुळे सदर इरादपत्राच्या मुळ विधिग्राह्यतेची ३ वर्षाची कालावधी किंवा १ वर्षाच्या २ मुदतवाढीच्या कालावधीत अशा खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना प्रकल्प पूर्ण करुन नोंदणी प्रमाणपत्र घेण्यासाठी उद्भवलेली अडचण दुर करण्याच्या संदर्भात, उद्यानांचा इरादापत्रची वैधता संपुष्टात आल्याने व सदर इरादापत्रास मुदतवाढ देण्याची तरतूद यापूर्वीच्या शासन आदेशात नसल्याने उद्भवलेल्या परिस्थितीमध्ये मार्ग काढण्याच्या दृष्टिकोनातुन माहिती तंत्रज्ञान / माहिती तंत्रज्ञान सेवा धोरण अंतर्गत गठित करण्यात आलेल्या शक्तिप्रदान समितीच्या दिनांक १०/१०/२०१३ रोजीच्या बैठकीत प्रस्ताव

विचारार्थ ठेवण्यात आला होता. सदर बैठकीत शक्तिप्रदान समितीने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन समउचित कार्यपध्दती विहित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय:**

२. उपरोक्त प्रश्नांचा सर्वांगिण विचार करुन यापूर्वी इरादापत्राची वैधता व मुदतवाढ याविषया संदर्भातील वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय / शासन शुध्दीपत्रके / परिपत्रके, मार्गदर्शक सूचना इ. सदर तरतूदीपुरते अधिक्रमित करुन, खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान व त्यातील माहिती तंत्रज्ञान उद्योग घटकांना नवीन इरादापत्र (De-novo) घेणे तसेच इरादापत्राची मुदत संपण्यापुर्वी विहित वेळेत विकासकाने मुदतवाढी साठी अर्ज करावयाची अट क्षमापित करण्याच्या संदर्भात खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना / घटकांना सदर सवलती / सूट मिळण्यासाठी पात्रतेची सुधारीत निकष व अटी व शर्ती आणि कार्यपध्दती पुढीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:-

(अ) शक्तीप्रदान समितीच्या तिसऱ्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाला अनुसरुन खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाचे बांधकाम पूर्ण झाले आहे, परंतु नोंदणी न घेतलेल्या उद्यानासंदर्भात पुढील प्रमाणे कार्यपध्दती अबलंबिण्यात यावी.

"ज्या खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांनी इरादापत्र घेऊन ५ वर्षाहून अधिक काळ झालेला आहे व त्यांनी सदर कालावधीत बांधकाम पूर्ण केले आहे परंतु इरादापत्र व्यपगत ठरलेले आहे. तसेच हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापूर्वी नियोजन प्राधिकारणाकडून भोगवाटा प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, अशा खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना अधिमूल्य न आकारता नवीन (de-novo) इरादा पत्र ( LOI ) देण्यात यावे. इरादापत्रास प्रचलित माहिती तंत्रज्ञान धोरण लागु असेल त्याची विधीग्राह्यता तीन वर्षाची राहील. या कालावधीत सदर माहिती तंत्रज्ञान उद्यानांमध्ये किमान ५० टक्के बांधीव क्षेत्रावर माहिती तंत्रज्ञान किंवा सहाय्यभूत सेवा घटक स्थापित होणे बंधनकारक राहिल."

(ब) खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाचे बांधकाम पूर्ण न झालेल्या उद्यानासाठी अवलंबिण्याची कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील.

"प्रचलित धोरणानुसार माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या विकासकाने इरादापत्र मिळाल्यापासून ५ वर्षाच्या आत प्रकल्प पूर्ण करुन नोंदणी प्रमाणपत्र घेणे अपेक्षित आहे. परंतु माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील मंदीमुळे तसेच मोठे प्रकल्प पूर्ण होण्यास येत असलेल्या अडचणीमुळे पूर्ण न झालेल्या खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना अधिमूल्य भरुन नवीन ( de-novo) इरादापत्र घेऊन उद्यानाचे प्रकल्प पूर्ण करुन नोंदणी प्रमाणपत्र घेता येतील. सदर नवीन ( de-novo) इरादापत्रास प्रचलित माहिती तंत्रज्ञान धोरण लागू असेल. त्याची विधीग्राहयता ३ वर्षाची राहील. सदर वाढीव मुदतवाढीच्या कालावधीमध्ये माहिती तंत्रज्ञान उद्यानाची उभारणी पूर्ण न झाल्यास पुढील मुदतवाढीच्या संदर्भात प्रकरणाच्या गुणवत्तेनुसार प्रत्येक प्रकरणात निर्णय घेण्यात येईल."

(क) माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या इरादापत्राची मुदत संपल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीपर्यंत विकासकाने सक्षम प्राधिकाऱ्याकडे नोंदणी व वैधता कालावधीच्या मुदतवाढीसाठी अर्ज करण्याची अट क्षमापित करुन प्रकल्प वेळेत पूर्ण करुन घेण्याच्या संदर्भात पुढीलप्रमाणे कार्यपध्दती लागू करण्यात यावी.

"विद्यमान माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरणांतर्गत, माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या इरादपत्राची मुदत / मुदतवाढ संपल्यानंतर ६ महिन्याच्या कालावधीपर्यंत विकासकाने सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी / वैधता कालावधीसाठी मुदतवाढीचा अर्ज करण्याची अट शिथिल करुन अशा इरादपत्राचा एकूण कालावधी ५ वर्षापलीकडे जाणार नाही या अटीच्या अधिन राहून, प्रचलित माहिती तंत्रज्ञान धोरणांतर्गत १ वर्षासाठी विधिग्राह्यता वाढवून देण्याचा अधिकार, विकास आयुक्त (उद्योग) यांना मुंबईसाठी व महाव्यवस्थापक (जिल्हा उद्योग केंद्र) यांना संबंधित जिल्हयाकरीता राहतील."

(ड) माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या de-novo इरादापत्र मिळविण्यासाठी कार्यपध्दती :-

i) **शुल्क :-** माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या इरादापत्रासाठी / de-novo इरादापत्रासाठी / इरादापत्राच्य मुदतवाढीसाठी / शुध्दीपत्रासाठी अर्जासोबत रुपये ५०००/- एवढे शुल्क पुढील लेखशिर्षाखाली प्रवर्तकांनी भरणा केल्याचे रिझर्व्ह बँकेच्या चलनाची प्रत जोडण्यात यावी.

**" 0851 Village & Small Industries**
**102, Small Scale Industries**
**Cottage & Small Industries**
**0851-002-6 "**

ii) **अधिमुल्यामधील फरकाची रक्कम :-**

उपरोक्त परि-२ (अे) मध्ये नमूद केलेली प्रकरणे वगळता, उद्योग संचालनालयाचे de-novo इरादापत्र दिलेल्या सर्व खाजगी उद्यानांच्या विकासकाने मूळ इरादापत्र घेताना रेडी रेकनर दराने आकारलेले विहीत अधिमुल्य (प्रिमियम ) तसेच नवीन de-novo इरादापत्र मिळाल्यावर नवीन रेडी रेकनर दराने होणारे विहीत अधिमुल्य (प्रमियम) यातील फरक भरणे आवश्यक असेल.

iii) **de-novo इरादापत्र घेण्यासाठी कार्यपध्दती :**

(a) ज्या खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांना इरादापत्र घेऊन ५ वर्षे कालावधी पूर्ण होऊनही ज्या प्रकल्प पूर्ण झालेला नाही/नोंदणी झालेली नाही. अशा खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या प्रवर्तकांनी विहीत नमुन्यात विहीत कागदपत्रासह विकास आयुक्त (उद्योग) यांचेकडे de-novo इरादापत्र मिळण्यसाठी शुल्कासह अर्ज सादर करावयाचा आहे.

(b) सदर अर्जाची छाननी करुन विकास आयुक्त (उद्योग) हे de-novo इरादापत्र मिळणेसाठी तत्वत: मान्यतेचे पत्र विकासकास देतील व त्याची प्रत संबंधित नियोजन प्राधिकरणास ही दिली जाईल.

(c) संबंधित विकास प्राधिकरणाने अर्जदार विकासकाकडून वर परिच्छेद २(ड) (ii) मध्ये नमूद सुत्रानूसार अधिमुल्य वसुल करुन तसे विकास आयुक्त (उद्योग) यांना लेखी स्वरुपात कळवायचे आहे.

(d) संबंधित विकास प्राधिकरणाकडून अधिमुल्य वसूल केल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विकास आयुक्त (उद्योग) यांनी संबंधित खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानास de-novo इरादापत्र दयावयाचे आहे.

३. हा शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकास, उपरोक्त विषया संदर्भात विविध स्तरावरील प्रलंबित प्रकरणे, प्रस्तुत निर्णयामधील तरतूदीच्या अधीन राहून निकालात काढावीत.

४.	या शासन निर्णयाद्वारे या विषयाबाबत शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय / आदेश यातील फक्त इरादापत्राची वैधता व मुदतवाढी संबंधी तरतुदी निरसित करण्यात येत आहे. हा शासन निर्णय निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासून अमलात येईल.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संगणक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २०१४०५२८१५४१५९४२१० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(व्यं.ह.कुलकर्णी)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रत,
१) अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२) प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,
३) प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
५) विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई.
६) मा.मंत्री (उद्योग), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव.
७) मा.राज्यमंत्री (उद्योग), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव.
८) मा. विरोधी पक्ष नेते विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) आयुक्त , महानगरपालिका (सर्व)
१०) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई.
११) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व) मुंबई.
१२) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
१३) विभागीय आयुक्त, मुंबई/पुणे /नाशिक/नागपूर/ औरंगाबाद/ अमरावती
१४) महानिरीक्षक, नोदणी व नियंत्रक, मुद्रांक शुल्क, पुणे.
१५) निमंत्रक, उद्योग मित्र, मुंबई.
१६) उद्योग सह संचालक (माहिती तंत्रज्ञान) उद्योग संचालनालय, मुंबई
१७) संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, पुणे.
१८) उप महानिरीक्षक, मुद्रांक शुल्क, मुंबई.
१९) उद्योग विभागातील सर्व सह सचिव/उप सचिव/कक्ष अधिकारी.
२०) कक्ष अधिकारी (म-१) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) निवड नस्ती (उद्योग-२)